# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २६२ ०६०१, २६१ ०६०२, २६४११५०/५१. फॅक्स - २६९०००७
E-mail : desk12@dtemaharashtra.gov.in Internet :www.dte.maharastra.gov.in

महत्त्वाचे/ईमेलद्वारे

क्रमांक : १२/आस्था(१)/ग्रंथपाल/२०१९/३७४
दिनांक : 20 MAY 2019

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय : ग्रंथपाल पदाचे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षावरुन ६० वर्षे झाल्याने सेवाविषयक व आर्थिक लाभ देणेबाबत

संदर्भ : शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र. सवेआ-३२११/(९७/१५)/तांशि-२, दि. ५.३.२०१९

उपरोक्त संदर्भ क्र. १च्या शासन निर्णयान्वये, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार राज्यात कार्यरत असणाऱ्या शासकीय, अशासकीय अनुदानित तंत्रनिकेतने, अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ यातील ग्रंथपाल या शिक्षक समकक्ष पदाचे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षावरुन ६० वर्षे करणेस शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने, अधिनस्त संस्था/कार्यालयकडून संबंधित ग्रंथपालांना द्यावयाच्या लाभांबाबत वारंवार मार्गदर्शनाची मागणी केली जात आहे.

त्यास अनुसरुन, सदर शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आलेल्या तरतुदीनुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे सूचित करण्यात येत आहे.

१) दि. १.१.२००६ ते शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंत सेवानिवृत्त होऊन २ वर्षापेक्षा अधिक कालावधी झालेल्या ग्रंथपालांना वयाच्या ६० व्या वर्षी सेवानिवृत्त करण्यात आले आहे असे गृहीत धरुन म्हणजेच ते नियमित कर्मचारी आहेत असे समजून त्यांना **सेवानिवृत्तीचे लाभ व इतर सर्व अनुषंगिक लाभ** देण्यात यावेत.

२) दि. १.१.२००६ ते शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंत सेवानिवृत्त होऊन २ वर्षापेक्षा कमी कालावधी झालेल्या ग्रंथपालांना पुन्हा सेवेत सामावून घेतल्यामुळे म्हणजेच पुनर्नियुक्ती करण्यात आलेल्या ग्रंथपालांना ते नियमित कर्मचारी आहेत असे समजून त्यांना सेवानिवृत्तीचे लाभ व इतर सर्व अनुषंगिक लाभ देण्यात यावेत.

तरी, वरील प्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या दृष्टीने आपल्या अधिनस्त संस्थांना तात्काळ कळवून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास शीघ्र सादर करावा जेणेकरुन शासनास अहवाल सादर करणे या संचालनालयास शक्य होईल.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा, मुंबई

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(ब)/ग्रंथपाल/२०१९/ 2084
दिनांक : 21 MAY 2019

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
४१२, ई, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

प्रत : या कार्यालयाच्या अधिनस्त शासकीय संस्था / कार्यालय प्रमुख./ अशासकीय अनुदानित संस्था
त्यांना कळविण्यात येते की, मुख्य कार्यालयाच्या संदर्भित पत्रात सूचित केल्यानुसार ग्रंथपाल पदांबाबत आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मुख्य कार्यालयास desk12@dtemaharashtra.gov.in या ई मेल ॲड्रेसवर व या कार्यालयाच्या est.ropune@gmail.com या ई मेल ॲड्रेसवर सादर करावी, तसेच माहिती निरंक असल्यास तसेही त्वरित कळविणे.

प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी रवाना.